# राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ, नागपूर

## ◆★ शिक्षकेतर कंत्राटी कर्मचारी पदभरती जाहिरात ★◆

*जाहिरात क्र. :* रातुमनावि/सा.प्र./१२३८ *दिनांक :* १५ जून, २०२३

## Walk - in - Interview

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठात Walk-in-Interview च्या माध्यमातून **कंत्राटी पद्धतीवर, तात्पुरत्या स्वरूपात (१) कनिष्ठ अभियंता (स्थापत्य) [Junior Engineer (Civil)]; (२) अधिक्षिका (महिला क्रीडा वसतीगृह) [Warden (Ladies Sports Hostel)];** अशी पदे भरावयाची आहेत.

**विद्यापीठात Walk-in-Interview च्या माध्यमातून भरावयाच्या पदांच्या मुलाखती दिनांक ३ जुलै २०२३ रोजी खाली दर्शवीलेल्या वेळेनुसार पदनीहाय आयोजित केलेल्या आहेत.**

| पदाचे नाव | मुलाखतीचा वेळ | |
|---|---|---|
| | पासून | पर्यंत |
| (१) कनिष्ठ अभियंता (स्थापत्य) [Junior Engineer (Civil)] | सकाळी ११.०० वा. | दुपारी १.०० वा. |
| (२) अधिक्षिका (महिला क्रीडा वसतीगृह) [Warden (Ladies Sports Hostel)] | दुपारी २.०० वा. | दुपारी ४.०० वा. |

**"आवेदन शुल्काची रक्कम ऑनलाईन पद्धतीने भरण्याकरिता"**

**Category:- Open** - येथे क्लिक करावे

**Category:- Reserved** - येथे क्लिक करावे

**"पात्र उमेदवारांनी आवेदन अर्जाच्या नमुन्यासाठी"** येथे क्लिक करावे

**कंत्राटी तत्वावर भरावयाच्या वरील पदांसाठी आवश्यक असलेली शैक्षणिक अर्हता, अनुभव, वय व पात्रतेच्या इतर निकषासंबंधीची विस्तृत माहिती खालीलप्रमाणे :-**

### १. कनिष्ठ अभियंता (स्थापत्य) [Junior Engineer (Civil)]

| | | |
|---|---|---|
| *पदसंख्या* | : | ०३ (तीन) |
| *कंत्राट कालावधी* | : | ११ (अकरा) महिने |
| *वेतन* | : | रू.१८,०००/- प्रति महिना [(वेतन सुधारित होण्याची शक्यता आहे.)(Likely to br revised)] |

| | | |
|---|---|---|
| ***शैक्षणिक अर्हता व अनुभव*** | : | १. मान्यताप्राप्त विद्यापीठाची स्थापत्य अभियांत्रिकी किंवा समकक्ष पदवी द्वितीय श्रेणीत / पदविका परीक्षा किमान प्रथम श्रेणीत उत्तीर्ण.<br>२. शैक्षणिक / औद्योगिक / शासकीय संस्थेमधील प्रत्यक्ष इमारत बांधकामाच्या पर्यवेक्षणाचा, स्थापत्य अभियांत्रिकी संबंधी कामाचा अणि व्यवस्थापन, दैनंदिन पत्रव्यवहार, निविदा व करारनामे, अंदाजपत्रके तयार करणे इत्यादी कामाचा किमान तीन वर्षाचा अनुभव. |
| ***वयोमर्यादा*** | : | सर्व उमेदवारांसाठी किमान वयोमर्यादा १८ वर्षे असून खुल्या प्रवर्गातील उमेदवारांसाठी कमाल वयोमर्यादा ३८ वर्षे आणि मागासवर्गीय उमेदवारांसाठी कमाल वयोमर्यादा ४३ वर्षे राहील. |

## २. अधिक्षिका (महिला क्रीडा वसतीगृह)
## [Warden (Ladies Sports Hostel)]
## (फक्त महिला उमेदवारांसाठी)

| | | |
|---|---|---|
| ***पदसंख्या*** | : | ०१ (एक) |
| ***कंत्राट कालावधी*** | : | ११ (अकरा) महिने |
| ***वेतन*** | : | रू.१५,०००/- प्रति माह<br>तसेच, किराया विरहित (Rent free) निवासगृहाची व्यवस्था. |
| ***शैक्षणिक अर्हता व अनुभव*** | : | १. सैनिकीसेवेतून नायक किंवा हवालदार किंवा सुभेदार किंवा त्यापेक्षा वरिष्ठ पदावरून सेवानिवृत्त झालेली व्यक्ती किंवा राज्य / केंद्र शासनाच्या सुरक्षा विषयक विभागातील सेवानिवृत्त अधिकारी.<br>२. कोणत्याही विषयात पदव्युत्तर असलेली किंवा N.C.C. 'B' प्रमाणपत्र धारण केलेली पदवीधर व्यक्ती.<br>३. प्रशासकीय व तत्सम पर्यवेक्षकीय कामाचा अनुभव असावा.<br>४. प्राध्यापक / शिक्षक या पदावर कामकरण्याचा अनुभव व संगणकाचे ज्ञान असणाऱ्यास प्राधान्य राहील. |
| ***वयोमर्यादा*** | : | सर्व उमेदवारांसाठी कमाल वयोमर्यादा ५० वर्षे राहील. |

याकरीता, पात्र उमेदवारांनी विद्यापीठाच्या **www.nagpuruniversity.ac.in** या संकेतस्थळावर उपलब्ध करून देण्यात आलेल्या विहित नमुन्यात माहिती भरून (आवश्यक सहपत्रांसह) आवेदनपत्र सर्व संबंधित प्रमाणपत्रे इत्यादींच्या स्वच्छ आणि सुवाच्च स्वयं साक्षांकीत प्रतींच्या एकूण **सहा प्रती** सोबत आणाव्या. जाहिरातीमध्ये नमूद केलेल्या वेळापत्रकानुसार मुलाखतीसाठी उपस्थित असतांना सर्व माहिती (जन्म तारीख, पात्रता, अनुभव इ.) यांच्या मुळ प्रती सह उपस्थित राहावे.

## अर्जदारांसाठी सर्वसाधारण सूचना

उमेदवारांनी आपले अर्ज भरण्यापूर्वी त्यांची शैक्षणिक अर्हता, अनुभव, वय, इत्यादी बाबी पडताळून पाहाव्यात. तसेच खालील सूचना व अटींचे लक्षपूर्वक वाचन करावे.

१) **सदर जाहिरातीतील सर्व पदे कंत्राटी पद्धतीवर, तात्पुरत्या स्वरूपात, पदासमोर नमूद कालावधीकरिता भरावयाची असून काम समाधानकारक आढळल्यास सदर पदांवरील नियुक्तीचा कालावधी वाढविण्याचे अधिकार विद्यापीठाने राखून ठेवले आहे.**

२) प्रत्येक पदासाठी स्वतंत्र अर्ज सादर करावा.

३) सर्व पदांसाठी उमेदवारांस **मराठी भाषेचे ज्ञान** असणे आवश्यक आहे.

४) आवेदकांनी विद्यापीठाच्या **www.nagpuruniversity.ac.in** या संकेतस्थळावर उपलब्ध असलेल्या विहित नमुन्यामध्येच टंकलिखित, हस्तलिखित किंवा संगणकीय प्रिंट केलेला अर्ज **(परिपूर्ण भरलेला अर्जाचा नमुना व संबंधित प्रमाणपत्रांच्या स्वसाक्षांकित प्रती)** एकूण **सहा प्रतीत** सादर करावा. विहित नमुन्यातील अनुक्रमांकामध्ये / रकान्यामध्ये कुठलाही बदल करू नये. अर्ज भरतांना रकाने किंवा ओळी कमी पडत असल्यास अधिकची माहिती स्वतंत्र कागदावर द्यावी व तसे अर्जात योग्य त्या ठिकाणी नमूद करावे. **अर्जदाराने आवेदनपत्रातील "प्रपत्र-अ" (Proforma 'A') मध्ये माहिती भरणे अत्यावश्यक आहे. सदर प्रपत्रात माहिती सादर न केल्यास आपल्या अर्जाचा विचार करण्यात येणार नाही.**

५) **अर्जासोबत मागासवर्गीय [अनुसूचित जाती (अ.जा.), अनुसूचित जमाती (अ.ज.), विमुक्त जमाती (वि.ज.), भटक्या जमाती (भ.ज.), विशेष मागासवर्गिय प्रवर्ग (वि.मा.प्र.), व इतर मागासवर्गिय प्रवर्ग (इ.मा.व.)] उमेदवारांनी रू. २००/- व खुल्या प्रवर्गातील उमेदवारांनी रू.३००/- चा भरणा जाहिरातीतील पान क्र. १ वर दर्शविल्याप्रमाणे ऑनलाईन पद्धतीने केल्यानंतर जनरेट झालेली पावती जोडावी.**

६) आवेदन शुल्क ऑनलाईन पद्धतीने भरल्याबाबतची पावती अर्जासोबत जोडने आवश्यक आहे.

७) अर्जासोबत आवेदन शुल्काचा Demand Draft (D.D.) स्विकरला जाणार नाही.

८) अर्जदाराने अर्जाच्या **किमान दोन प्रतीत** विहित नमुन्यात दर्शविलेल्या स्थानी स्वत:चा स्वसाक्षांकित केलेला फोटो चिटकवावा.

९) मुलाखतीस उपस्थित राहतेवेळी उमेदवाराने सर्व आवश्यक व संबंधित प्रमाणपत्रांच्या मुळ प्रती सोबत आणणे आवश्यक आहे.

१०) अर्जासोबत शैक्षणिक पात्रता, व्यावसायिक अनुभव, वय, जात, जातवैधता, इत्यादी संबंधी आवश्यक प्रमाणपत्रांच्या छायांकित व स्वसाक्षांकित प्रती जोडाव्यात. **अर्जासोबत मुळ प्रमाणपत्रे जोडू नयेत.**

११) सुवाच्च अक्षरात नसलेले, अपूर्ण, चुकीची माहिती भरलेले, विहित नमुन्यात नसलेले, आवश्यक शैक्षणिक अहर्ता व अनुभव धारण करीत नसलेले, वयोमर्यादेत मोडत नसलेले, अर्जासोबत आवश्यक असलेल्या प्रमाणपत्रांच्या छायांकित व स्वसाक्षांकित प्रती नसलेले, इत्यादी त्रुटी असलेले अर्ज तसेच सर्व प्रमाणपत्रांसह सहा प्रतींमध्ये नसलेले अर्ज अवैध ठरविल्या जातील व विचारात घेतल्या जाणार नाही.

१२) **अर्जदाराने आवश्यक असलेली शैक्षणिक पात्रता, अनुभव व वय हे मुलाखतीचे तारखेपर्यंत धारण केलेले असावे.**

१३) अर्जाच्या छाननीअंती अर्जदार अपात्र ठरल्यास अर्जदारास मुलाखतीला जाता येणार नाही.

१४) उमेदवारांनी भरती प्रक्रियेत विद्यापीठाशी संबंधित अधिकारी व सेवकांवर कोणत्याही प्रकारचे प्रत्यक्ष वा अप्रत्यक्ष दडपण तथा राजकीय किंवा सामाजिक दबाव आणण्याचा प्रयत्न केल्यास अथवा अप्रत्यक्ष संपर्क साधण्याचा प्रयत्न केल्यास, अशा उमेदवारांस अपात्र ठरविल्या जाईल.

१५) मुलाखतीस आलेल्या अर्जदारांना स्वखर्चाने उपस्थित राहावे लागेल.

१६) विद्यापीठ प्रशासनाद्वारे आयोजित मुलाखतीस येणाऱ्या संबंधीत उमेदवाराची ठराविक दिवशी प्रशासनाच्या कोणत्याही अडचणीमुळे मुलाखत पार न पडल्यास अशा संबंधीत उमेदवारांची प्रशासनाच्या निर्देशान्वये इतर दिवशी मुलाखत आयोजित करण्यात येईल व त्याकरिता मुलाखतीस संबंधीत उमेदवारास स्वखर्चाने उपस्थित रहावे लागेल.

१७) निवड प्रक्रिया सुरू झाल्यानंतर किंवा नियुक्तीउपरांत उमेदवाराने चुकीची माहिती/प्रमाणपत्रे सादर केल्याचे किंवा माहिती लपवून ठेवल्याचे निदर्शनास आल्यास त्याची निवड/नियुक्ति तात्काळ रद्द करण्यात येईल व असा उमेदवार कायदेशीर कारवाईस पात्र राहील.

१८) जाहिरातीत बदल किंवा दुरूस्ती करण्याबाबत, तसेच संपूर्ण जाहिरात रद्द करण्याबाबतचे अधिकार राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाने राखून ठेवले आहे.

१९) जाहिरातीत नमूद कलेल्या पदांसंदर्भात कोणतेही वाद निर्माण झाल्यास सर्व वाद नागपूरातील सक्षम न्यायालयाच्या अखत्यारीत राहतील.

**कुलसचिव**
राष्ट्रसंत तुकडोजी महाराज
नागपूर विद्यापीठ